POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०८ ● मुंबई, बुधवार, १० जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

## 10 जूनपासून अखखा महाराष्ट्र भिजणार, 30 जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह कोसळणार

### आएमडीचा नवा अलर्ट, पेरणीबाबत शेतकऱ्यांना महत्त्वाचा सल्ला



उकाड्याने हैरान असलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांसाठी आता खुशखबर आली आहे. ३० जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, पुण्यासह अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

उकाडा, आणि घामाच्या धारांनी त्रस्त झालेल्या राज्यातील नागरिकांना आता हवामानात मोठा बदल अनुभवायला मिळणार आहे. भारतीय हवामान विभागाने महाराष्ट्रातील तब्बल ३० जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला असून पुढील काही दिवस राज्यातील अनेक भागांत वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता वर्तवली आहे. मुंबई, पुणे, ठाणे आणि कोकणासह राज्याच्या विविध भागांमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

**३० जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा**

हवामान विभागाने ९-१० जून रोजी राज्यातील ३० जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, अहमदनगर, धुळे, नंदुरबार, बीड, परभणी, लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा त्यामध्ये समावेश आहे.

या भागांमध्ये काही ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता असून विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

**चार दिवस पावसाची शक्यता**

पावसाचा हा प्रभाव केवळ एका दिवसापुरता मर्यादित राहणार नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. १० ते १३ जूनदरम्यान मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची मालिका कायम राहू शकते. सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये मान्सून अधिक सक्रिय होण्याची शक्यता असल्याने काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

नाशिक आणि अहमदनगरमध्येही विजांच्या कडकडाटासह पावसाळी वातावरण राहण्याचा अंदाज आहे. मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत हलक्या सरी कोसळू शकतात. मात्र, पाऊस पडूनही विदर्भ आणि खान्देशातील उष्णतेत फारसा दिलासा मिळण्याची शक्यता नसून तापमान ४० अंशांच्या पुढेच राहू शकते.

**पेरणीबाबत शेतकऱ्यांना महत्त्वाचा सल्ला**

राज्यात मान्सूनपूर्व हालचाली वाढल्या असल्या तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषी तज्ज्ञांनी दिला आहे. सर्वत्र समाधानकारक आणि सलग पाऊस झाल्यानंतरच खरिपाच्या पेरण्यांना सुरुवात करावी, असे तज्ञांचे मत आहे.

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे हवामानशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास डाखोरे यांनी सांगितले की, सध्या मराठवाड्यातील वातावरणामुळे मान्सूनच्या प्रगतीवर काही प्रमाणात परिणाम होत आहे. मात्र, १२ ते १८ जूनदरम्यान मान्सून संपूर्ण मराठवाडा व्यापण्याची शक्यता आहे.

**विजांच्या कडाडताना खबरदारी घ्या**

हवामान विभागाने नागरिकांना विशेष सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वादळी वारे आणि विजांचा कडकडाट सुरू असताना शेतात किंवा मोकळ्या मैदानात काम करणे टाळावे. झाडाखाली किंवा कच्च्या शेडमध्ये आश्रय घेऊ नये, कारण अशा ठिकाणी वीज पडण्याचा धोका अधिक असतो.

विजांचा कडकडाट सुरू असताना घरातील विजेची उपकरणे प्लगमधून काढून ठेवावीत. तसेच नदी, तलाव किंवा इतर जलस्रोतांमध्ये असलेल्यांनी तातडीने सुरक्षित ठिकाणी जावे, असे आवाहन हवामान विभागाने केले आहे.

## राज्यात 5 वेगवेगळे भीषण अपघात

### 30 हून अधिक प्रवासी जखमी... कुठे काय घडलं?



राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये पाच वेगवेगळे अपघात झाले असून यामध्ये तीसहून अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. हे अपघात कुठे आणि कसे झाले, त्याविषयी सविस्तर जाणून घ्या..

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यात विविध ठिकाणी पाच वेगवेगळे अपघात झाले आहेत. बुलढाण्यातील समृद्धी महामार्गावर पिंपरी-माळी गावाजवळ खाजगी प्रवासी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. तर दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरमध्ये मद्यधुंद चालकाची गाडी डिव्हायडर आणि ट्रकला धडकली. यात चार जण गंभीर जखमी झाले. पुणे-सातारा महामार्गावर खेडशिवापूर टोल नाक्याजवळ खोपी गावाच्या हद्दीत भरधाव एसटी बस रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारात कलल्याने अपघात झाला आहे. सुदैवाने ही बस पूर्णपणे पलटी न झाल्याने मोठा अनर्थ टळला आहे. तर नाशिक-मुंबई महामार्गावर मुंडेगावाजवळ कारचं टायर फुटल्याने अपघात झाला आहे. यात तीन जण जखमी झाले आहेत. याशिवाय मुंबई-गोवा महामार्गावरील मोरवंडे-बोरज इथं कार दरीत कोसळून पाच जण जखमी झाले आहेत. वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या या अपघातांबद्दल सविस्तर जाणून घेऊयात..

### हे अपघाताचे 5 ठिकाण

- **बुलढाणा :** बुलढाण्यातील समृद्धी महामार्गावर मेहकरजवळील पिंपरी माळी गावात खाजगी प्रवासी बसचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. समोर जाणाऱ्या ट्रकला खाजगी प्रवासी बसने पाठीमागून जोरात धडक दिल्याने हा अपघात झाला. जवळपास एक ते दीड तास काही प्रवासी बसमध्येच अडकून होते. अखेर पोलीस आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्यानंतर त्यांची सुटका करण्यात आली. ही खाजगी प्रवासी बस पुण्याहून नागपूरच्या दिशेने जाताना हा अपघात झाला. या घटनेत 20 ते 25 प्रवासी जखमी असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.
- **छत्रपती संभाजीनगर :** पैठण-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील बिडकीनजवळ मद्यधुंद चालकामुळे चारचाकीचा अपघात झाला. ही गाडी महामार्गावरील डिव्हायडर आणि ट्रकला धडकली. त्यात चार जण गंभीर जखमी झाले. रविवारी संध्याकाळी ही घटना घडली. चारचाकीतील मद्यधुंद चालकाने भरधाव वेगात आधी तीन वाहनांना हुलकावणी दिली. त्यानंतर एका वाहनाला धडक देत रस्त्यावरील डिव्हायडरवर आदळून समोरील ट्रकच्या पाठीमागे जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दाम्पत्यासह चार जण गंभीर जखमी झाले आहेत. जगदीश सिंग, जोगिंदर चौधरी, इसाक चांद महमद पठाण आणि बानो इसाक पठाण अशी गंभीर जखमी झालेल्यांची नावं आहेत.
- **भोर, पुणे :** पुणे झ सातारा महामार्गावर खेडशिवापूर टोल नाक्याजवळ खोपी गावाच्या हद्दीत भरधाव एसटी बस रस्त्याच्या कडेला असलेल्या गटरात कलल्याने अपघात झाला. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार चालकाचं बसवरील नियंत्रण सुटल्यानं हा अपघात झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवीतहानी झालेली नाही. बसमधील प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. साताऱ्याहून पुण्याच्या दिशेने जात असताना बसचा हा अपघात झाला. या अपघातात बस मुख्य रस्ता आणि सेवा रस्त्याच्या मधोमध असणाऱ्या गटरात जाऊन अडकली. सुदैवाने बस पूर्णपणे पलटी न झाल्याने मोठा अनर्थ टळला.
- **इगतपुरी :** नाशिक-मुंबई महामार्गावर मुंडेगावाजवळ कारला अपघात झाला. कारचं टायर फुटल्याने कार दुभाजकाला जाऊन धडकली आणि त्यात तीन जण जखमी झाले. जखमींना घोटी इथल्या खाजगी रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.
- **रत्नागिरी :** मुंबई-गोवा महामार्गावरील मोरवंडे-बोरज इथं रविवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात कार 20 ते 25 फूट खोल दरीत कोसळली. या अपघतात कारमधील पाच प्रवासी जखमी झाले. गणपतीपुळे इथं दर्शनासाठी जाऊन परत ठाण्याकडे निघालेल्या या कुटुंबाच्या वाहनाला हा अपघात झाला असून जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. रात्री 9.45 च्या सुमारास ही कार खेड तालुक्यातील मोरवंडे-बोरज इथल्या सुरभी हॉटेलसमोर आली असता चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटलं. काही प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, रस्त्यावर अचानक गाय आल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि कार रस्त्याच्या कडेला जाऊन थेट दरीत कोसळली. या अपघातात सिद्धी नाईक, रिद्धी नाईक, स्नेहल नाईक, सिद्धेश नाईक आणि तेजस बोरकर हे जखमी झाले आहेत. या सर्वांवर धन्वंतरी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## भाईंदरमधील बेकायदा धार्मिक स्थळांवर पालिकेचा हातोडा



■भाईंदर। प्रतिनिधी,

मिरा-भाईंदर शहरात भाईंदर पूर्वेच्या गोल्डन परिसरात मोक्याच्या ठिकाणी महापालिकेचे शासकीय आरक्षण राखीव असताना त्यावर बेकायदेशीररित्या धार्मिक स्थळ उभारून जागा काबीज केली होती. महापालिकेच्या सामाजिक वनीकरण आणि खेळाच्या मैदानाचे आरक्षण क्रं. १२२ वर असलेल्या भूखंडावर अनधिकृतपणे बांधण्यात आलेल्या २ धार्मिक स्थळांवर सोमवारी पहाटे महापालिका प्रशासनाने धडक तोडक कारवाई केली. सर्वोच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाच्या निदेर्शानुसार मिळालेल्या आदेशांचे पालन करत ही मोहीम राबवण्यात आली. अत्यंत संवेदनशीलतेने आणि शिस्तबद्ध नियोजनाद्वारे प्रशासनाने ही कारवाई कोणतीही अनुचित घटना न घडता शांततेत पार पाडली.

भाईंदर पूर्वेतील आझादनगर परिसरात महापालिकेचा आरक्षण क्रं. १२२ चा भूखंड आहे. हा भूखंड सामाजिक वनीकरण आणि खेळाच्या मैदानासाठी आरक्षित होता. मात्र, गेल्या काही वर्षापासून या भूखंडावर धार्मिक स्थळ, झोपड्या, गोदामे आणि काही व्यावसायिक आस्थापनांचे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण करण्यात आले होते. काही वर्षांपूर्वी या ठिकाणी बाळासाहेब ठाकरे कलादालन उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर भूखंड अतिक्रमणमुक्त करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. तीन वर्षांपूर्वी या झोपडपट्टी भागात लागलेल्या भीषण आगीत दोन जणांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर प्रशासनाने कठोर पावले उचलत बहुतांश अतिक्रमणे हटविली होती. मात्र, येथील धार्मिक स्थळे कायम होती. अखेर सर्व कायदेशीर बाबींची काटेकोरपणे पूर्तता केल्यानंतर प्रशासनाने सोमवारी पहाटे तोडक कारवाई केली.

ही कारवाई मिरा-भाईंदर महापालिकेचे आयुक्त राधाबिनोद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या धडक मोहिमेदरम्यान महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी व पोलीस स्वतः पहाटेपासून मैदानावर ठाण मांडून होते. यामध्ये प्रामुख्याने अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त स्वप्नील सावंत, सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र. ४ योगेश गुनिजन, भरत सोनारे, नरेंद्र डोंगरे यांच्यासह प्रभाग समिती क्रमांक १ ते ६ मधील सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी, फेरीवाला पथक प्रमुख आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे पथक मोठ्या संख्येने तैनात करण्यात आले होते.

## कशेडी घाटात कार-डंपरच्या धडकेत तरुणाचा जागीच मृत्यू, आई गंभीर जखमी

### मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात



■नवी मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटात सोमवारी दुपारच्या सुमारास एक अत्यंत भीषण आणि हृदयद्रावक अपघात घडला. भरधाव वेगात असलेली एक कार पुढे चालणाऱ्या अवजड डंपरवर मागून जोरदार आदळल्याने हा अपघात झाला. या भयंकर दुर्घटनेत एका ३५ वर्षीय तरुणाला आपला जीव गमवावा लागला असून, त्यांच्या ६५ वर्षीय आई गंभीर जखमी झाल्या आहेत. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांची मृत्यूशी झुंज सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात दुर्दैवी मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव बिजोष बालन असे आहे. बिजोष हे व्यावसायिक होते आणि ते कामानिमित्त बंगळुरू येथे वास्तव्यास होते. त्यांच्या आई लिसी बालन या काही दिवसांपूर्वी केरळ येथील त्यांच्या मूळ गावी गेल्या होत्या. आपल्या आईला पुन्हा कल्याण येथील घरी सुखरूप घेऊन येण्यासाठी बिजोष हे स्वतः केरळला गेले होते. मायलेकांचा हा परतीचा प्रवास सुरू असतानाच अचानक काळाने त्यांच्यावर झडप घातली आणि एका क्षणात या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, हा भीषण अपघात सोमवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कशेडी घाटातील भोगाव गावाजवळ घडला. बिजोष हे स्वतः आपली ह्युंदाई ग्रँड आय१० कार चालवत मुंबईच्या दिशेने येत होते. प्रवासादरम्यान अचानक कारवरील त्यांचे नियंत्रण सुटले आणि त्यांची भरधाव कार थेट पुढे चालणाऱ्या एका अवजड डंपरच्या मागच्या बाजूला जाऊन अत्यंत वेगात धडकली. ही धडक इतकी भयंकर होती की, यामध्ये कारच्या पुढच्या भागाचा अक्षरशः चक्काचूर झाला. या धडकेच्या तीव्रतेमुळे मायलेक दोघेही गाडीच्या सांगाड्यातच अडकून पडले होते.

या अपघाताची माहिती मिळताच पोलादपूर पोलीस आणि स्थानिक 'काळभैरव बचाव पथकाने' तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. चक्काचूर झालेल्या कारचे पत्रे कापून अत्यंत कठीण परिस्थितीतून या दोघांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. त्यानंतर त्यांना तातडीने पोलादपूर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, दुर्दैवाने उपचारापूर्वीच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बिजोष यांना मृत घोषित केले. त्यांच्या आई लिसी बालन यांना शरीराला गंभीर दुखापत झाल्याने, प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारांसाठी तातडीने कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले असून तिथे त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

या दुर्दैवी घटनेबाबत पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, "अपघातग्रस्त डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कायदेशीर प्रक्रिया सध्या सुरू आहे. नेमका हा अपघात कशामुळे घडला आणि चालकाचे कारवरील नियंत्रण का सुटले, याचा सविस्तर तपास पोलीस करत आहेत." दरम्यान, या भीषण अपघातामुळे वर्दळीच्या मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली होती. परंतु, पोलिसांनी तात्काळ दखल घेत क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून बाजूला केली आणि महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत केली.

## कोब्राच्या दंशाने 3 वर्षीय चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू... रुग्णालयात उडाला गोंधळ



■अंबरनाथ। प्रतिनिधी,

अंबरनाथमधील शिवमंदिर परिसरात धक्कादायक प्रकार उघडकीस आला. एका घरात शिरलेल्या कोब्रा सापाने तीन वर्षीय चिमुकल्याला दंश केला, ज्यात त्याचा दुदैवी मृत्यू झाला. या घटनेनंतर नातेवाईकांनी उल्हासनगर येथील जिल्हा मध्यवर्ती रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र, उपचारादरम्यान हलगर्जीपणा केल्याच्या आरोपातून चिमुकल्याचा दुदैवी अंत झाला. याच घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

**सापाच्या दंशाने 3 वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू**

घडलेल्या घटनेनुसार, सुलतान शेख (वय 3) हा चिमुकला घरात मोबाईल पाहत होता, त्याचदरम्यान त्याच्या कमरेला विषारी सापाने दंश केला होता. साप चावल्याचे लक्षात येताच कुटुंबियांनी त्याला तातडीने उल्हासनगर जिल्हा मध्यवर्ती रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा दुदैवी अंत झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली.

**उपचारादरम्यान अतिघाई अन् चिमुकल्याचा मृत्यू**

मुलाच्या मृत्यूनंतर संतप्त झालेल्या नातेवाईकांनी रुग्णालय प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. डॉक्टरांनी उपचार करताना अधिक अतिघाई केल्याने मुलाचा दुदैवी अंत झाल्याचा आरोप मुलाच्या कुटुंबीयांनी केला. त्यांच्या म्हणण्यांनुसार, रुग्णालयात केवळ रक्त तपासणी केली, मात्र आवश्यक ते उपचार दिले गेले नाहीत.

पुराव्यासाठी संबंधित सापालाही रुग्णालयात आणण्यात आले होते, पोलिसांनी हस्तक्षेप केला असता, तेव्हा दोघांमध्ये मोठा शाब्दिक वाद घडला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

दुसरीकडे उल्हासनगर जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांनी कुटुबीयांचे सर्व आरोप फेटाळून लावले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे, मुलाला रूग्णालयात आणल्यानंतर त्याची प्रकृती गंभीर झाली. डॉक्टरांच्या पथकाने त्याला वाचवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, मात्र ते यशस्वी ठरले नाही. संबंधित घटनेचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले.

## सर्पदंशामुळे 3 वर्षीय बालकाचा मृत्यू, आरोग्य व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह



■पालघर। प्रतिनिधी,

पालघर शहरातील भरवाड पाडा परिसरात घडलेल्या एका दुर्दैवी घटनेनं जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेची वस्तुस्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. सर्पदंशामुळे एका 3 वर्षीय चिमुकला आतिफ आशिक खानचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना केवळ एका मृत्यूपुरती मर्यादित नसून वर्षानुवर्षे रखडलेल्या प्रकल्पावर मोठं प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**आतिफच्या पायाला सर्पदंश**

आतिफ हा आपल्या घरापासून काही अंतरावर इतर मुलांसोबत खेळत होता. त्याचदरम्यान तो रडत रडत घरी आला होता. त्याने आईला पायाला काहीतरी चावल्याची माहिती दिली. आईने मुलाचा पाय पाहिला असता, त्याचा दोन ठिकाणी जखमा झाल्याचे आढळून आले होते. आतिफला तात्काळपणे पालघर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

**45 मिनिटांतच चिमुकल्याचा दुदैवी मृत्यू**


काही मिनिटांतच त्याची प्रकृती अधिक ढासळू लागली होती. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच, त्याला पुढील उपचारांसाठी पालघर येथील धवले रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. माहितीनुसार, सर्पदंशानंतर अवघ्या 45 मिनिटांतच चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आहे. या घटनेनं संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. नागरिकांनी संताप व्यक्त करत प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांचं म्हणणं असं की, पालघरमधील जिल्हा रुग्णालय आणि ट्रॉमा सेंटरचा प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडलेला होता. अपत्कालीन परिस्थितीत कोणाताही बदल झालेला दिसून आला नाही. दरम्यान, आतिफच्या मृत्यूनंतर हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. आरोग्य सुविधांच्या अभावामुळे आणखी भविष्यात किती नागरिकांना जीव घेतला जाईल असा प्रश्न उपस्थित होतो.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## विधान परिषदेत चुरस वाढली



**सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद निवडणुकीचे चित्र गेल्या काही दिवसांपासून अपेक्षेप्रमाणे एकतर्फी वाटत होते. मात्र महाविकास आघाडीने ऐनवेळी उमेदवार बदलत साताऱ्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे नेते अभयासिंह जगताप यांना रिंगणात उतरवल्याने या निवडणुकीला अचानक रंगत आणि चुरस निर्माण झाली. या घडामोडीमुळे राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल घडून आले असून दोन्ही आघाड्यांमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.**

सांगली-सातारा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील विधान परिषद निवडणूक गेल्या काही दिवसांपासून एकतर्फी होणार असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र महाविकास आघाडीने ऐनवेळी उमेदवार बदलत साताऱ्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे नेते अभयासिंह जगताप यांना रिंगणात उतरविल्याने निवडणुकीला अचानक चुरस प्राप्त झाली आहे. शरद पवार यांचे निकटवर्तीय मानल्या जाणाऱ्या जगताप यांच्या उमेदवारीमुळे महायुतीसमोर नवीन आव्हान उभे राहिले असून दोन्ही बाजूंनी पडद्यामागील राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुतीने या मतदारसंघातून धैर्यशील कदम यांना उमेदवारी दिली आहे. कदम यांना भाजपचे वरिष्ठ नेते व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा पाठिंबा असल्याचे मानले जाते. उमेदवारी अर्ज दाखल करतानाही भाजप व महायुतीतील प्रमुख नेते त्यांच्या सोबत उपस्थित होते. गेल्या आठवड्यापर्यंत महाविकास आघाडीने ही निवडणूक जवळपास सोडून दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. सांगलीचे बाळासाहेब पाटील यांचे नाव पुढे असताना निवडणुकीत विशेष रंगत दिसत नव्हती. मात्र ऐनवेळी उमेदवार बदलून जगताप यांना संधी देण्यात आल्याने राजकीय समीकरणे बदलू लागली आहेत. विशेषतः सांगली आणि सातारा जिल्ह्यातील महायुतीमधील नाराज गटांना एकत्र आणून अधिकृत उमेदवाराविरोधात मतदान घडवून आणण्याची रणनीती महाविकास आघाडीने आखल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी महायुतीतील गळती रोखण्यासाठी थेट मैदानात उतरल्याचे दिसून येत आहे. सोमवारी त्यांनी भाजपशी संबंधित सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांतील मतदार प्रतिनिधींशी संवाद साधत पक्षनिष्ठेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. वैयक्तिक नाराजी, स्थानिक मतभेद किंवा पाहुणचाराच्या राजकारणाला बळी न पडता महायुतीचे उमेदवार धैर्यशील कदम यांनाच मतदान व्हावे, असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. कोणाचीही नाराजी असेल, तर ती दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करू, मात्र मतदान पक्षाच्या अधिकृत उमेदवारालाच झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह असल्याचे समजते. महायुतीतील नाराजीचे केंद्र सातारा जिल्ह्यात अधिक असल्याची चर्चा आहे. अजित पवार गटाचे आमदार इद्रिस नायकवडी यांच्याशी संपर्क ठेवून त्यांच्याशी संबंधित मतदारांना एकत्र ठेवण्याचे प्रयत्न भाजपकडून सुरू आहेत. तसेच शिंदे सेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांच्या नाराजीच्या चर्चांनाही उधाण आले आहे. त्यांच्या नाराजीची दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना 'वर्षा' निवासस्थानी चचेर्साठी आमंत्रित केल्याचे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे. मात्र मतदार प्रतिनिधींनी कोणती भूमिका घ्यायची यावर सक्ती करता येणार नाही, अशी भूमिका देसाई यांनी घेतल्याची चर्चा आहे. महायुतीसमोरील आणखी एक आव्हान म्हणजे गोरे कुटुंबातील कथित नाराजी. धैर्यशील कदम यांना उमेदवारी मिळताना जयकुमार गोरे यांनी पाठपुरावा केल्याची चर्चा असून त्यामुळे शेखर गोरे नाराज असल्याचे बोलले जात आहे. या नाराजीचे परिणाम मतदानावर होतात का, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. महाविकास आघाडीसाठीदेखील परिस्थिती पूर्णपणे अनुकूल असल्याचे चित्र नाही. काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटातील काही स्थानिक नेते उघडपणे भाजपविरोधी भूमिका घेण्यास उत्सुक नसल्याचे दिसत आहे. काही नेत्यांचे महायुतीतील प्रभावशाली नेत्यांशी जुने राजकीय संबंध असल्याने मतदानाच्या वेळी ते कोणती भूमिका घेतात, हे निर्णायक ठरू शकते. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकांमध्ये पक्षीय गणितांपेक्षा वैयक्तिक संबंध, स्थानिक समीकरणे आणि नाराज गटांची भूमिका महत्त्वाची ठरत असते. त्यामुळे संख्याबळ एका बाजूला दिसत असले तरी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी चित्र बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकूणच, महाविकास आघाडीने उमेदवार बदलून निवडणुकीत उत्सुकता निर्माण करण्यात पहिल्या टप्प्यात यश मिळवले आहे. मात्र ही चुरस मतदानापर्यंत कायम राहते की महायुती आपले संख्याबळ आणि संघटनशक्तीच्या जोरावर बाजी मारते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. सध्या तरी सांगली-सातारा विधान परिषद निवडणुकीचे पारडे नेमके कोणाच्या बाजूने झुकले आहे, याचा ठाम अंदाज बांधणे राजकीय जाणकारांनाही कठीण झाले आहे.

## गडकरींची मुंबई-गोवा महामार्गावरील महाथाप!



भाजपचे खासदार नारायण राणे यांच्या १० एप्रिल रोजी सार्जया झालेल्या पंच्याहत्तराव्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम मे महिन्याच्या अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचा शब्द जाहीरपणे व्यासपीठावरून दिला होता. मे महिना संपून आता जूनचा पहिला आठवडा सुरू आहे. परंतु, या महामागार्चे काम रखडलेल्या अवस्थेतच असून गडकरींचा शब्द ही पुन्हा एकदा मारलेली राजकीय महाथापच ठरली आहे.

मुंबई-गोवा महामागार्चे काम पूर्ण करण्याकरिता ३१ मेची डेडलाईन पाळण्याच्या दृष्टीने प्रशासकीय धडपडही होताना दिसली नाही. केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आपला दिलेला ३१ मे रोजीचा शब्द पाळण्यासाठी राजकीय प्रयत्न ही होताना जाणवले नाहीत. नेहमीप्रमाणे जसे अगदी मुंबई-गोवा महामागार्चे काम सुरू असते तसेच अगदी संथगतीनेच या महामागार्चे काम सुरू राहिले. आता तर काय पावसाळ्याला सुरुवात होणार असून या महामार्गाच्या कामाला पुन्हा एकदा ब्रेक लागणार आहे. त्यानंतर पुन्हा हे काम कधी सुरू होणार आणि ते पूर्णत्वास जाईपर्यंत आणखी किती काळ राजकीय थापा ऐकायला मिळणार, हे देवालाच ठाऊक. नुसत्या थापा मारून या महामागार्चे काम कधीच पूर्ण होणार नाही, याचे समाजभान किमान मंत्र्यांनी जपणे आवश्यक आहे.

मुंबई-गोवा महामागार्बाबत नितीन गडकरी यांनी दिलेले आश्वासन हवेतच विरल्याची आणि कोकणवासीयांच्या पदरी निराशा येण्याची ही काही पहिली वेळ नाही. केवळ गडकरीच कशाला गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतच्या अनेक वजनदार राजकीय नेत्यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या कामांविषयी आश्वासन देणे आणि नेहमीप्रमाणे काम रखडणे याची कोकणवासीयांना जणू सवयच झाली आहे. यापूर्वी नितीन गडकरी यांनी गेल्या वर्षी जून २०२५ मध्ये मुंबई-गोवा महामागार्चे काम पूर्ण होणार असल्याचे आश्वासन १९ एप्रिल २०२५ रोजी एका जाहीर व्यासपीठावरून दिले होते. जून २०२५ काय जून २०२६ सुरू झाला तरी मुंबई-गोवा महामागार्चे काम रखडलेल्या अवस्थेत आहे. गेल्या वर्षी गणेशोत्सवादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील मुंबई-गोवा महामागार्चे काम जवळपास ९० टक्के पूर्ण झाले असून केवळ १० टक्क्यांचेच काम बाकी असल्याचे सांगितले होते. लवकरच पूर्ण होईल, असे आश्वासन त्यांनीदेखील दिले होते. परंतु, यंदाच्या गणेशोत्सवापर्यंत तरी ते पूर्ण होईल की नाही, हे येणारी वेळच ठरवेल.

शिवेसना (उबाठा) खासदार अरविंद सावंत यांनी गेल्या वर्षी संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभा सभागृहात मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडपट्टीविषयी प्रश्न उपस्थित केला होता. भारताला चंद्रावर पोहोचण्यासाठी जितका खर्च झाला नाही त्यापेक्षाही अधिक खर्च करूनदेखील मुंबई-गोवा महामागार्चे काम १५ वर्षांपासून अधिक काळ रखडून ते अपूर्णावस्थेत असल्याचे अरविंद सावंत यांनी सभागृहाच्या लक्षात आणून दिले होते. अरविंद सावंत यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला त्यावेळी मंत्री नितीन गडकरी यांनी उत्तर देताना मुंबई-गोवा महामागार्चे काम एप्रिल २०२६ पर्यंत पूर्ण करू, असे सभागृहाला आश्वस्त केले होते. परंतु, हीदेखील एक राजकीय थापच ठरली. जून २०२५, एप्रिल २०२६ आणि मे २०२६ पर्यंत मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण करण्याचा राजकीय शब्द अशा एकामागोमाग एक राजकीय थापांमुळे कोकणवासीयांचा नितीन गडकरी यांच्यावरील विश्वास पूर्णपणे उडाला आहे. याउलट एकामागोमाग एक थापांमुळे कोकणवासीयांच्या संतापात आणखी भर पडत आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या कामाचा खर्च चांद्रयान-३ मोहिमेपेक्षा सुमारे ६१५ कोटी रुपये अधिक आहे. म्हणजेच भारताची चंद्रावर जाण्याची वाट ही मुंबई-गोवा महामार्गाच्या तुलनेत अधिक स्वस्त आणि कमी खर्चिक आहे. मुंबई-गोवा महामागार्चे काम २०११ साली सुरू झाल्यानंतर सुरुवातीला सुमारे ८ हजार कोटींचा यासाठी अंदाजे खर्च व्यक्त करण्यात आला होता. परंतु, अनेक वर्षांच्या विलंबाने वाढून हा खर्च १५ ते १६ हजार कोटींच्या वर गेल्याचे सांगण्यात येते. पर्यावरणविषयक आवश्यक परवानग्या, भूसंपादनाची जटिल प्रक्रिया आणि कंत्राटदारांच्या बदलत्या कारभारामुळे या प्रकल्पाला तब्बल १५ वर्षांहून अधिक काळ लागला असून खर्चही मोठ्या प्रमाणात झाला आहे. तरी महामार्ग अपूर्णच आहे. चांद्रयानच्या २ मोहीम अयशस्वी जरूर ठरल्या. परंतु, चांद्रयान-३ च्या यशानंतर भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाय ठेवत जगात नव्या इतिहासाची नोंद केली. भारत चंद्रावर पोहोचला तरी कोकणवासीयांचा मुंबई-गोवा महामार्गावरील रखडपट्टीचा संघर्ष काही थांबलेला नाही.

मुंबई-गोवा महामार्गाचेंकाम मे २०२६च्या डेडलाईनपर्यंत पूर्ण झालेले नाही. याउलट टोल सुरू करण्याची घाई केली. जून ते सप्टेंबर हे पावसाचे दिवस राहणार असून यादरम्यान काम होणार की नाही, तसेच झाले तरी किती प्रमाणात महामागार्चे काम होणार, त्याचा वेग कितपत असणार, यासोबतच त्याचा दर्जा, असे अनेक प्रश्न कोकणवासीयांच्या मनात आहेत. ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यापासून तर गणेशोत्सवाची लगबग सुरू होईल. यंदाही कोकणवासीयांची काही मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडपट्टीतून सुटका नाही. पावसाळ्यात या महामार्गावरील प्रवास अधिकच खडतर आणि धोकादायक होणार आहे, हे स्पष्ट आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या प्रवासातही मुंबई-गोवा महामार्गावर प्रवास करताना खड्डे आणि चिखलातूनच वाट काढावी लागणार आहे. मे महिन्याचे आश्वासन हवेत विरल्यानंतर आता पुढे काय, याचे कोणतेही उत्तर सत्ताधार्यांकडे सध्या तरी नाही.

मे महिन्याचे आश्वासन हवेत विरल्यामुळे आता कोकणवासीयांच्या छातीत धडधड वाढली आहे, हे काही वेगळे सांगायला नको. कारण, पावसाळा तोंडावर आहे. कोकणातील मुसळधार पावसात अर्धवट राहिलेल्या रस्त्यांची काय दुरवस्था होते, हे कोकणवासीय चांगलेच ओळखून आहेत. धुळीचे रूपांतर चिखलात होईल. खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांचे प्रमाण वाढणार नाही, याची हमी सरकार देणार का? खड्डेमय रस्ते, चिखलयुक्त महामागार्मुळे होणार्या वाहतूक कोंडीतून वाट कशी काढायची? जेमतेम ६ ते ८ तासांच्या प्रवासासाठी कोकणवासीयांनी १२ ते १५ तास का खर्ची घालायचे, याची उत्तरे कोण देणार? एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे इंधन बचतीचे आवाहन करत आहेत. परंतु, मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडपट्टीमुळे अनेक जण ६ ते ८ तासांऐवजी १२ ते १५ तासांचा प्रवास करत आहेत. त्यातून होणार्या इंधनाचा अपव्यय सरकारला दिसेनासा झाला आहे का?

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्गमंत्री नितीन गडकरी, जे देशात ह्यहायवे किंगह्ण म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कामाचा वेग थक्क करणारा आहे. दिवसाला सरासरी अनेक किमी लांबीपर्यंत रस्त्यांची निर्मिती करत त्यांनी देशात नवा आदर्श उभा केला आहे. जवळपास १२ वर्षांपासून केंद्रात मंत्री असणार्या गडकरी यांनी अनेक महत्त्वाच्या महामार्गांची निर्मिती करत देशाच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. ते दुर्लक्ष करता येणार नाही. नितीन गडकरी यांनी देशभरात एक्सप्रेसवेचे जाळे विणले आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. मुंबई आणि पुणे यांसारख्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडण्यासाठी एक्स्प्रेस वेची निर्मितीदेखील गडकरी यांनीच केली होती. दिल्ली-मुंबई एक्सप्रेस वे किंवा नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग ज्या वेगाने पूर्ण झाले, ते पाहता मुंबई-गोवा महामार्गही लवकर पूर्ण होईल, अशी रास्त अपेक्षा होती. परंतु, कोकणवासीयांनी या महामागार्साठी जमिनी दिल्या नसल्याची खंतदेखील ते वेळोवेळी मांडत आले आहेत. कोकणात जमिनीच्या लहान तुकड्यांमध्येही अनेक भावंडे वाटेकरी असतात. अनेकदा त्यांच्यात एकमत होत नाही. वारंवार कोर्टात खटले दाखल होतात. त्यामुळे भूसंपादनही मोठ्या प्रमाणात रखडले आहे. मुंबई-गोवा महामार्ग रखडण्यामागे भूसंपादनाची ही जटिल प्रक्रिया आणि येथे कंत्राटदार टिकत नसल्याची दोन महत्त्वाची कारणेदेखील ते देतात. तीही विचारात घेणे आवश्यक आहे.

कारण कोकणची माणसं साधी भोळी, असे गीतामध्ये म्हटले असले तरी मुंबई-गोवा हा एकच मार्ग इतकी वर्षे का रखडला याचा विचार करायला हवा. नितीन गडकरी यांनी हाती घेतलेले देशातील अन्य महामार्ग प्रकल्प मार्गी लागतात, मग हा एकमेव प्रकल्प इतकी वर्षे कसा काय रखडतो, याचाही विचार व्हायला हवा. कारण एका बाजूला सरकार आहे, तर दुर्सया बाजूला कोकणातील लोक आहेत. जेव्हा आपण सरकारकडे बोट दाखवतो, तेव्हा तीन बोटे आपल्याकडे असतात, हेही विसरता कामा नये. मुंबई-गोवा महामार्ग तयार करणारे अनेक कंत्राटदार तर कोकणातील स्थानिक राजकीय नेत्यांना हसे देऊन कंगाल झाले आहेत, अशीही चर्चा आहे. त्यात पुन्हा हा महामार्ग रखडण्यात कोकणी माणसांचा आडमुठेपणाही कारणीभूत आहे, हेदेखील लक्षात घ्यावे लागेल. कुठल्याही समस्येतून सामोपचाराने मार्ग काढण्यापेक्षा कोर्टकचेर्या करून वर्षानुवर्षे प्रकरण लटकवून ठेवण्याची कोकणी माणसाला जुनी सवय आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते. कोकणातील लोकप्रतिनिधी आणि लोक यांनी या महामागार्बाबत आत्मचिंतन करण्याची गरज आहे. तरच तो पूर्णत्वास जाईल. अन्यथा, राजकीय नेत्यांच्या थापा ऐकत राहण्यावाचून गत्यंतर उरणार नाही.

## इंधन विवेके क्रिया पालटावी...




इंधन-ऊजेर्बाबत आत्मनिर्भर होण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न करण्याची गरज आहे. परंतु त्याचवेळी इंधनाचा वापरही कार्यक्षमरीत्या होण्याची गरज आहे. इंधनाबाबत पूर्णतः स्वावलंबी होणे अशक्य असले, तरीदेखील आयातीवरील विसंबन कमीत कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. एकूणच आपल्याला गरज आहे ती इंधन विवेकाची.

सध्याच्या संकटसमयी कुणी काटकसर करायला तयार नाही. युक्रेन, गाझापट्टी आणि नंतर पश्चिम आशियातील युद्ध... अशी चोहीकडे संकटेच संकटे आहेत. अमेरिका-इराणमधील धुमसत्या शस्त्रसंधीचा गेल्या बुधवारी पुन्हा एकदा भंग होऊन त्यामुळे तेलाचे भाव आणखी दोन टक्क्यांनी भडकले आहेत. जागतिक इंधनसंकट अधिकच गंभीर बनले आहे. मे महिन्यात पेट्रोल व डिझेलच्या दरात चौथ्यांदा वाढ करण्यात आली असली, तरी भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल व हिंदुस्तान पेट्रोलियम या तीन प्रमुख सरकारी कंपन्यांना आजही दररोज ५५० कोटी रुपयांचा तोटा सोसावा लागत आहे. यापूर्वी झालेल्या दरवाढीसह आणखी १२ रुपये प्रतिलिटरपर्यंत दर वाढवल्यास, तेल कंपन्यांना इंधन विक्रीत किमान ना नफा, ना तोटा स्तर गाठता येईल, असा दावा केला जात आहे.

गेल्या तीन महिन्यांत कच्च्या तेलाचे दर ५० टक्क्यांहून जास्त वाढले आहेत. म्हणजे पाच राज्यांतील निवडणुका होण्याच्या आधीपासूनदेखील पेट्रोल-डिझेलचे दर टप्प्याटप्प्याने वाढवण्यास वाव होता. तेल कंपन्यांना दर ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे, असे यूपीएप्रमाणेच एनडीए सरकारही म्हणत असते. परंतु प्रत्यक्षात तसे ते नाही! केंद्राने मार्चअखेरीस पेट्रोल-डिझेलवरील उत्पादनशुल्कात प्रतिलिटर दहा रुपयांची कपात केली. इंधन निर्मितीवर विंडफॉल कर पुन्हा लागू केला. या दोन्ही इंधनांच्या किमती नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने हे पाऊल उचलण्यात आले आहे. मात्र त्यानंतरच्या दोन महिन्यांत जागतिक बाजारातील कच्च्या तेलाच्या तेजीमुळे सरकारी कंपन्यांचा तोटा वाढतच चाललेला आहे.

सततचा दुष्काळ, प्रचंड गरिबी, शेतीवरील माणसांचा मोठा भार आणि बेरोजगारांचेच वाढते सैन्य अशा अत्यंत प्रतिकूल काळात, १९७३-७४ मध्ये जगावर असेच तेलसंकट कोसळले होते. त्यावेळी अरब-इस्रायल संघर्ष भडकलेला असल्यामुळे तेलसमृद्ध अरब राष्ट्रांनी पाश्चात्त्य देशांचा तेलपुरवठा रोखला होता. संघटितरीत्या कच्च्या तेलाचे दर चौपटीने वाढवले. याचा गॅसपुरवठ्यावरही परिणाम होऊन, घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी दोन-दोन, तीन-तीन आठवडे लागू लागले. अमेरिका व पाश्चात्त्य देशांनी इस्रायलला लष्करी व आर्थिक मदत केली. त्यामुळे इस्रायलच्या समर्थक देशांवर अरब तेलउत्पादक देशांनी 'एम्बार्गो' लागू केला. तेल उत्पादनही घटवले. त्यामुळे कच्चे तेल बॅरलला ३ डॉलर होते, ते १२ डॉलरवर जाऊन पोहोचले.

भारतासह जगभरातील भाववाढ ३०० टक्क्यांनी वाढली. अशावेळी भारताने रशियन संशोधकांच्या सहकार्याने मुंबई हायमध्ये शोधकार्य हाती घेऊन तेलविहिरी खोदल्या. ओएनजीसीने 'सागरसम्राट' या ड्रिलशिपद्वारे मुंबई हाय क्षेत्राचा विकास केला. यथावकाश या क्षेत्रातील तेलविहिरींची संख्या ८,५०० झाली. नैसर्गिक वायूच्या ३३ विहिरी खणण्यात आल्या. देशाच्या खनिज तेलाच्या एकूण गरजेपैकी १४ टक्के गरज मुंबई हायमुळे पूर्ण झाली. एस्सो, काल्टेक्स व बमार्शेल या विदेशी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करून, एचपीसीएल व बीपीसीएल या कंपन्यांची स्थापना करण्यात आली. मुंबई हायमधील खनिज तेलाच्या शुद्धीकरणाचे काम सरकारी कंपन्यांमार्फत होऊ लागले. याला अर्थातच तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची दूरदृष्टी कारणीभूत आहे. आज मात्र या गोष्टीचा अभाव जाणवतो.

जगातील शंभरावर देशांनी ऊर्जावापराच्या संदभार्तील आपली धोरणे बदलली असून, काही देशांत इंधन वापरावर निर्बंध आणण्यात आले आहेत. भारत आपली तेलाची निकड बव्हंशी आयातीतून भागवतो. २०-२२ टक्के तेल व वायू होर्मुझमार्गे येते. तो पुरवठा आता बाधित झाला आहे. भारताची विद्यमान तेल साठवणूक क्षमता ३ कोटी ८० लाख बॅरल्स इतकी असून, आता त्यात आणखी ३ कोटी बॅरल्सची भर पडणार आहे. मात्र अमेरिकेची साठवणूक क्षमता ४३ कोटी बॅरल्स, तर जपानची २६ कोटी बॅरल्स आणि चीनची १०४ कोटी बॅरल्स इतकी क्षमता आहे. तेल साठवणुकीकडे आपण दीर्घकाळ दुर्लक्ष केले. भारताला रोज ५० लाख बॅरल्स तेलाची गरज भासते. ज्यावर अवघी अर्थव्यवस्था अवलंबून आहे, त्या तेलाची अशी उपेक्षा करणे आपल्याला फार महागात पडलेले आहे. तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊ पाहणाऱ्या भारताकडे सध्याच्या पाचपटीने तरी तेल साठवणूक क्षमता असायला हवी.

सन २०१४ मध्ये नरेंद्र मोदी सत्तेवर आल्यानंतर त्यांनी २०२२ पर्यंत इंधन आयात किमान १० टक्क्यांनी आणि २०३० पर्यंत २७ टक्क्यांनी घटवण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. याचा अर्थ, तेल क्षेत्रातील गुंतवणूक वाढवून नवीन तेल क्षेत्रे खोदण्याचे काम जोरकसपणे हाती घेतले जाणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात तसे काहीही झाले नाही. तेल आयात ७७ टक्क्यांवरून ८८ टक्क्यांपर्यंत वाढलीच. उज्ज्वला गॅस योजना महिलांसाठी उपयुक्त व धूर कमी करणारी, हे खरेच. परंतु देशाला लागणारा बहुतांश घरगुती गॅस आपण बाहेरून आणत आहोत. निम्माअधिक पाइप गॅस हा आयात केला जातो. अर्थातच पश्चिम आशिया पेटल्यामुळे भारताने इंधन पुरवठ्यासाठी नवनवीन देशांमधील पुरवठास्रोत 'टॅप' केले आहेत, हे योग्यच.

व्हेनेझुएला हा जगातील सर्वांत मोठा प्रमाणित कच्च्या तेलाचा साठा असलेला देश आहे. आत्तापर्यंत भारताने व्हेनेझुएलाकडून ४ लाख २७ हजार बॅरल तेल खरेदी केले आहे. त्या देशाच्या हंगामी राष्ट्रपती डोल्सा रॉड्रिग्ज यांच्या भारत दौऱ्यानंतर तेथून तेलपुरवठा वाढण्याचीच शक्यता आहे. अमेरिकेनंतर भारत हा व्हेनेझुएलाचा सर्वांत मोठा ग्राहक झाला असून, रिलायन्स इंडस्ट्रीजनेही तेथून तेलखरेदी करण्यात आघाडी घेतली आहे.

कच्च्या तेलाच्या चढ्या भावांमुळे पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे धोरण योग्य ठरते. त्यासाठी सार्वजनिक वाहतुकीचे जाळे विस्तारणे आणि मेट्रो प्रवासाचे दर कमी करणे, त्याचप्रमाणे कार्सवर कर वाढवणे हे उपाय गरजेचे आहेत. महिनाभरापूर्वी केंद्र सरकारने ८५ टक्क्यांवरून १०० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या कारनिर्मितीस प्रोत्साहन देण्याचे धोरण जाहीर केले. यामुळे पेट्रोल-डिझेलचा वापर कमी होईल. परंतु याबाबतची सरकारची धोरणे स्थिर नसतात. ती अचानकपणे बदलल्यास त्याचा फटका बसतो. साखरेची महागाई रोखण्यासाठी केंद्र सरकार वेळोवेळी उसाचा रस किंवा बी-हेवी मोलॅसिसपासून इथेनॉल बनवण्यावर तात्पुरते निर्बंध आणते. त्यामुळे साखर कारखान्यांचे नियोजन कोलमडते. त्याचप्रमाणे इथेनॉल प्रकल्पासाठी ४०-५० कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागते. परंतु सार्वजनिक तेल कंपन्यांकडून 'साखर'वाल्यांकडून कमी इथेनॉल घेतले गेले. त्यांनी प्राधान्य दिले ते भात, मका यापासून तयार झालेल्या इथेनॉलला. तसेच इथेनॉल खरेदीचे पैसे वेळेवर न मिळाल्यामुळे साखर कारखानदार अडचणीतही आले. आता साखर कारखानदारांनी स्वतःच इथेनॉल पंप सुरू करावेत, अशी सूचना केंद्रीय रस्तेमंत्री नितीन गडकरी यांनी केली आहे. ८० टक्के इथेनॉलवर चालणाऱ्या गाड्या बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल होणार आहेत. पण यापुढे तरी सरकारने आपल्या धोरणात वारंवार बदल करू नयेत, ही अपेक्षा आहे.

जगभरात वाढते प्रदूषण आणि जीवाश्म इंधनाचे घटणारे साठे यामुळे पेट्रोल-डिझेलला पयार्यी धनाचा विचार केला जात आहे. इलेक्ट्रिक कार, बस व दुचाकींचा वापर वाढला आहे. दिल्ली-एनसीआरमधील वायुप्रदूषणाची समस्या सोडवण्यासाठी नोंदणीकृत असलेले जुने ट्रक आणि बसेस रस्त्यावरून हटवण्याच्या योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. 'भारत स्टेज-४' किंवा त्याहून जुन्या गाड्या स्क्रॅप करून वा दिल्लीबाहेर विकून, त्याऐवजी इलेक्ट्रिक वाहने खरेदी केल्यास, करसवलतींसह आर्थिक प्रोत्साहन देण्याची ९५८५ कोटी रुपयांची ही योजना आहे. त्यात ५०४१ कोटी रुपयांचा भार केंद्र उचलणार आहे. उर्वरित वाटा दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणा ही राज्य सरकारे उचलतील. ईव्हीजचा वापर वाढवण्यासाठी 'पीएम ई ड्रायव्हर'सारख्या योजना आहेत. ई स्कूटर, ई कार, ई बस खरेदीवर अनुदान दिले जाते. अनेक राज्य सरकारे रस्ते कर व नोंदणीशुल्कात १०० टक्क्यांची सूट देतात. महाराष्ट्रात गाडीच्या बॅटरी क्षमतेनुसार अतिरिक्त अनुदान मिळते. मात्र ईव्हीसाठी चार्जिंग पायाभूत सुविधांवर भर देण्याची आवश्यकता आहे.

दुसरे पर्यायी इंधन म्हणजे हायड्रोजन इंधन. हायड्रोजन फ्युएल्स सेल तंत्रज्ञानाद्वारे वाहनांना ऊर्जा मिळते. या प्रक्रियेत केवळ पाण्याची वाफ तयार होते व प्रदूषण निर्माण होत नाही. अनेक बड्या कंपन्या हायड्रोजन कार विकसित करत आहेत. सीएनजी व बायोगॅस हेदेखील तुलनेने स्वच्छ इंधन मानले जाते. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या वाहनांवरही सध्या शास्त्रज्ञ संशोधन करत आहेत.

मुळातच भारतात इंधन-ऊर्जा या विषयाबद्दल जाणीवजागृती निर्माण होणे गरजेचे आहे. केंद्र सरकारमधील एखाद्या ज्येष्ठ मंत्र्याकडे ऊजार्मंत्रालय सोपवून, त्याअंतर्गत, रिन्युएबल पॉवर, कोळसा आणि पेट्रोलियम ही सर्व खाती आणावीत. तसेच इंधनबचतीबद्दलचे प्रबोधन शालेय स्तरापासून केले जावे. गाड्या उडवणे व इंधनाची उधळपट्टी करणे हा सामाजिक बेजबाबदारपणा आहे, हे तरुण पिढीच्या मनावर बिंबवले गेले पाहिजे.

सन २०१३-१४ ते २०२३-२४ या कालावधीत भारताचा दरडोई वीजउपभोग ४६ टक्क्यांनी वाढला आहे. येत्या २० वर्षांत भारतातील सरासरी उत्पन्न चौपटीने वाढेल, अशी अपेक्षा आहे. म्हणजेच व्यापार-उद्योग वाढेल. परंतु त्यासाठी मोठ्या प्रमाणात वीज लागणार आहे. एकूण विजेतील औष्णिक विजेचेच प्रमाण ७९ टक्के असून, या विजेसाठी अर्थातच कोळसा लागतो. मात्र भारतातील आयात केल्या जाणाऱ्या कोळशाचे प्रमाण जास्त (२३ टक्के) असल्याची कबुली केंद्र सरकारनेच दिली आहे. दशकभरापूर्वी भारत ४० टक्के नैसर्गिक वायू आयात करत होता. त्याचे प्रमाण आता ५० टक्क्यांवर गेले आहे. तर याच काळातील कच्च्या तेलाच्या आयातीचे प्रमाण ८५ वरून ९० टक्क्यांवर गेले आहे. वास्तविक जगातील चौथ्या क्रमांकाची रिन्युएबल एनर्जीची क्षमता भारतात आहे. पवनऊर्जेत आपण चौथ्या आणि सौर ऊर्जेबाबत जगात तिसऱ्या स्थानी आहोत. इंधन-ऊर्जेबाबत आत्मनिर्भर होण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न करण्याची गरज आहे. परंतु त्याचवेळी इंधनाचा वापरही कार्यक्षमरीत्या होण्याची गरज आहे. तसेच परदेशांतून नैसर्गिक वायू आणून त्यावर स्वयंपाक करण्याऐवजी हे काम आपण विजेवरच करू शकू का, याचाही विचार झाला पाहिजे. इंधनाबाबत पूर्णतः स्वावलंबी होणे अशक्य असले, तरीदेखील आयातीवरील विसंबन कमीत कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. इंधन ही आपली राष्ट्रीय संपत्ती असून, तिचे जतनसंवर्धन आणि वापर सर्वांनीच तोलूनमापून करायला हवा. हा इंधनविवेक आपण मानसी धरायला हवा.

# पॅनकेक
## झटपट आणि चविष्ट

**साहित्य :-** २ वाटी मैदा किवा गव्हाचे पीठ, ३ चमचे पिठीसाखर, १ चमचा बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, ३ चमचे तूप, १ ते दिड वाटी दूध. १ चमचा, व्हॅनिला एस्सेंस

**कृती:-** मैदा, पिठीसाखर, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा, व्हॅनिला, मेल्टेड तुप हे सर्व साहित्य व्यवस्थित एकत्र करुन घ्यावे. यानंतर यामध्ये थोडे-थोडे दुध घालून मिश्रण थोडे सैलसर करावे. इडलीच्या मिश्रणाप्रमाणे हे मिश्रण तयार झाले पाहीजे. जास्त पातळ करु नये. आता हे मिश्रण पाच मिनिटासाठी झाकून ठेवावे. यानंतर (अगदी बारीक आचेवर) नॉनस्टीक पॅन वरती थोडेसे तुप लावून घ्यावे, व त्यावर पळीने थोडे-थोडेसे मिश्रण घालावे (फुलक्या एवढेच लहानसे पसरावे). एका बाजुने भाजून दुसया बाजूनेही सोनेरी सर भाजून घ्यावे. ही अगदी साधीसोपी एगलेस पॅन केकेची रेसिपी आहे.



**टिप्स -**

- बेकिंग सोडा आणि बेकिंग पावडर या दोघांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. त्यामुळे हे दोन्ही वापरले जाते.
- जर या मिश्रणामध्ये बेकिंग सोडा ऐवजी एक अंडे फेटून घातले तर तो पॅनकेक ही चविष्ट लागतो.

केसांच्या सुंदरतेसाठी आपण काय नाही करत.. स्पा, तेलाने मॉलिश आणि वेगवेगळे सौंदर्य प्रसाधने देखील वापरात आहात. परंतु काही आहार आपल्या केसांच्या सौंदर्यतेला आणि बळकटीला परत मिळवून देऊ शकतात. ते ही कुठल्याही प्रकाराचा त्रास न घेता. जाणून घेउया हे 5 आहार ज्यांचा सेवनाने आपल्या केसांच्या समस्यांचं निरसन होऊ शकतं.

# मजबूत केसांसाठी आहारात सामील करा या वस्तू



**पालक:** पालक खाणं फायदेशीर असतं. आरोग्याबरोबरच हे आपल्या केसांच्या गळतीला ही थांबवत. यात मुबलक प्रमाणात आयरन (लोखंड) मुबलक आढळल्यामुळे केसांसाठी हे वरदान ठरतं.



**गाजर :** लाल गोड गाजर चवी बरोबरच आपल्याला चांगले आरोग्य आणि सौंदर्य देखील देतं. तसेच हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्रोत आहे. त्याच बरोबर यामध्ये असलेले कॅरोटीन आपल्या केसांना आणि डोळ्यांना सुरक्षित आणि सुंदर ठेवतं. आपल्या केसांना मूळापासून हे बळकट करत.

**दही:** दही खाल्याने देखील केसांची गळती थांबते. केस सुंदर आणि चमकदार बनतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी 6 आणि व्हिटॅमिन डी आपल्या केसांना नवे चैतन्य आणि चांगले आयुष्य देतं.

**रताळे :** ह्याला गोड बटाटा देखील म्हणतात. यात व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळतं. जे आपल्या केसांना बळकट करून केसांची गळती थांबवतं. आपल्या मुळांमध्ये आढळणारं तेल देखील सुरक्षित ठेवतं. जेणे करून आपल्या केसांना पोषण मिळतं.

**बेदाणे :** आपल्या केसांची वाढ होत नसल्यास काळजी करु नये. बेदाणे खाल्याने आपल्या केसांची जलद गतीने वाढ होते. यामध्ये आयरन( लोखंड) आणि मिनरल्स (खनिजे) मुबलक प्रमाणात असतात. जे आपल्या केसांना पोषण देतं.

# कडू कारल्याचे १४ गुणकारी फायदे
## वाचा आणि लगेच अमलात आणा

हिरव्या भाज्यांमध्ये आपल्याकडे आकर्षित करणारं कारलं चवीला कडू जरी असले, तरी ही त्यापासून मिळणारे अनेक फायदे नक्की गोड आहेत. आपणास ठाऊक आहे का कारल्याचे हे आरोग्यविषयक फायदे ? जर नाही तर मग नक्की जाणून घेऊया कारल्याचे फायदे...



- कारल्यामध्ये फास्फोरस मुबलक प्रमाणात आढळतं. हे कफ, बद्धकोष्ठता आणि पचनासंबंधी समस्या दूर करतं. कारल्याचा सेवनाने अन्नाचे पचन व्यवस्थित होते. तसेच भूक सुद्धा मोकळेपणाने लागते.
- दम्याचा त्रास असल्यास कारलं खूपच फायदेशीर ठरतं. या आजारात कारल्याची भाजी काही ही मसाले ना वापरता देखील भाजी बनवून खाल्याने फायदेशीर ठरतात.
- पोटात गॅस बनत असल्यास आणि अपचनामध्ये कारल्याच्या रस घेणे चांगलेच असते, जेणे करून आपल्यापासून हे आजार लांबच राहतं.
- कारल्याचा रस प्यायल्याने आपले यकृत बळकट होतच, त्याचबरोबर यकृताचे सर्व त्रास बरे होतात. दररोज नियमाने हे घेतल्यास एका आठवड्यात चांगले परिणाम दिसून येतात. कावीळ मध्ये देखील हे फायदेशीर आहे.
- कारल्याची पाने किंवा फळाला पाण्यात उकळवून प्यायल्याने, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आणि कुठल्याही प्रकाराचे संसर्ग झाल्यास बरे होतात.
- उलट्या, जुलाब, किंवा कॉलरा झाला असल्यास कारल्याचा रसात काळंमीठ टाकून प्यायलास लगेच आराम मिळतो. जलोदर झाला असल्यास देखील दोन चमचे कारल्याचा रस पाण्यामध्ये टाकून प्यायल्याने फायदा होतो.
- अर्धांगवायूचा त्रास झाला असेल तरी ही कारलं खाणे खूप प्रभावी उपाय आहे. त्यात कच्च कारलं रुग्णासाठी फायदेशीर आहे.
- रक्त स्वच्छ करण्यासाठी देखील कारलं अमृता सारखे आहेत. मधुमेहाचा आजारांसाठी देखील हे प्रभावी मानले आहे. मधुमेह असल्यास एक चतुर्थांश कप कारल्याचे रस, तेवढ्याच प्रमाणात गाजराचा रस पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे.
- रक्ताळ मूळव्याध झाली असल्यास 1 चमचा कारल्याच्या रसात अर्धा चमचा साखर टाकून प्यायल्यास मूळव्याधीच्या त्रासात आराम मिळतो.
- संधिवात किंवा हातपायाची जळजळ होत असल्यास कारल्याच्या रस चोळणे फायदेशीर असतं.
- मूत्रपिंड (किडनी)च्या त्रासासाठी कारल्याचे उकळलेले पाणी आणि कारल्याचा रस दोन्हीही फायदेशीर असतात. ह्याचा सेवनाने मूत्रपिंड सक्रिय होऊन शरीरातील हानिकारक पदार्थांना शरीराच्या बाहेर काढते.
- हृदयाच्या विकारांसाठी कारलं हे रामबाणच आहे. हे हानिकारक चरबीला हृदयाचा रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ देत नाही. यामुळे रक्त पुरवठा व्यवस्थित होतो आणि हृदयाघात होण्याची शक्यता नसते.
- लिंबाच्या रसाबरोबर कारल्याचे रसाला चेहऱ्यावर लावल्याने मुरूम बरे होतात, आणि त्वचेचे आजार होत नाही.
- कर्करोगाशी लढण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

# फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.



**हल्ली** चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

**पोलिसांत तक्रार करा**

या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

**सिम कार्ड ब्लॉक करा**

फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

**मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा**

फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.

**यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा**

जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

**सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा**

मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

**या उद्भवतात समस्या–** नखातील मळ, घाण पोटात गेल्याने पोटदुखी आणि अपचन यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. काही जणांना नखांबरोबर त्याच्या बाजूची त्वचा खाण्याचीही सवय असते. यामुळे नखांना नखुर्डे होण्याची शक्यता असते.

**असा करा उपाय –** काही मोठ्या व्यक्तींना देखील नखे खाण्याची इच्छा होते. याचे निरीक्षण करावे, समजा एखाद्या गोष्टीचा ताण आल्यावर किंवा एखाद्या गोष्टीची भीती वाटल्यावर नखे कुरतडली जातात. मात्र, अशावेळी शांतपणे विचार करा. स्वतःबाबत कोणत्याही प्रकारचा कमीपणा वाटून घेऊ नका. अतिविश्वास बाळगायला शिका. समस्यांना घाबरून न जाता सामोरे जायला शिका. कोणत्याही गोष्टींची उत्सुकता असेल त्यावेळी मन शांत ठेवत हात तोंडाकडे जाऊ देऊ नका.



## तुम्हालाही नखे कुरतडण्याची सवय आहे?

**माणसाची पचनक्रिया चांगली असेल तर त्याचे आरोग्य चांगले राहते. व्याधी उद्भवू नयेत किंवा रोगांचा शरीरात शिरकाव होऊ नये, यासाठी पचनक्रिया व्यवस्थित असणे फार महत्त्वाचे असते. पचन बिघडले की अनेक आजार सुरू होतात. पचन बिघडण्यामागे अनेक कारणे असतात.**

# अपचन : घरच्या घरी मिळवा असा आराम

वेळीअवेळी अरबट चरबट खाणे, अति तेलकट, जड पदार्थांचे वारंवार सेवन, अपुरी झोप, पोट साफ न होणे, दीर्घकाळ काहीही न खाणे यामुळे अपचन होते आणि त्याचा परिणाम म्हणजे पोटात जळजळ, करपट ढेकर, पोटदुखी, पोट फुगणे, उलटी, जुलाब अशी लक्षणे दिसू लागतात. थंडीच्या तुलनेत उन्हाळ्यात अपचन होण्याचे प्रमाण अधिक असते.

अपचन अति खाण्यापिण्यामुळे झाले असेल तर त्यावर काही घरगुती उपचार जरूर करावेत. त्याने बराच आराम मिळतो. अपचनाचा त्रास होऊ लागला की घरात वेलदोडा असतो, त्याची कुटून पूड करावी आणि अर्धा चमचा पूड खडीसाखरेबरोबर घ्यावी. वेलदोडा पाचक आहे. तसेच तीन चिमूट जायफळ पूड आणि दोन चमचे लिंबू रस दररोज घेतल्यास ज्यांना नेहमी अपचन होते, त्यांची समस्या दूर होते.

धणेपूड आणि सुंठ यांचे मिश्रण पचनासाठी फार मदतगार ठरते. दोन चमचे धणेपूड, अर्धा चमचा सुंठ दोन ग्लास पाण्यात घालून उकळून थंड करावे. हे पाणी २-२ चमचे तीन वेळा घ्यावे. सुंठ आणि बडीशेप पचन सुधारण्यास मदत करणारे आहेत. पाव चमचा सुंठ, १चमचा बडीशेप आणि थोडी खडीसाखर सकाळ, दुपार, संध्याकाळ चावून खावी.

पोट फार दुखत असेल तर ओवा तव्यावर भाजून चावून खावा. त्यावर थोडे कोमट पाणी प्यावे. आल्याचा रस आणि सैंधव व थोडे हिंग यांचे चाटण करून ते घ्यावे. आल्याचे नुसते तुकडे चावून खावेत. हिंग पोट विकारांवर अतिशय उत्तम गुणकारी असून त्यामुळे गॅस कमी होण्यास मदत मिळते. हिंग कोमट पाण्यात घालून प्यावे किंवा पूड पोटावर चोळावी. सकाळी पिकलेले केळे खाल्ल्यानेही पचन सुधारते.

# घनदाट, मुलायम केसांसाठी लावा केळ्यांपासून तयार केलेला हेअर पॅक



स्त्रियांचे खरं सौंदर्य त्यांच्या केसात दडलेलं असतं, असं म्हणतात. अनेक जणींना लांब, काळेभोर केस आवडतात. मात्र सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशा लांबसडक केसांची काळजी घेणं शक्य होत नाही. केसांची काळजी ही लहानपणी आई घेते आणि नंतर मोठेपणी अनेक कारणांनी त्याकडे दुर्लक्ष होते आणि मग अचानक कधीतरी जाणवते... केस गळत आहेत, पिकताहेत, रुक्ष झालेत इत्यादी. मग त्यानंतर घनदाट, मुलायम आणि निरोगी केसांसाठी घरगुती उपाय करण्याकडे अनेकांचा कल असतो. आज आपण घनदाट केसांसाठी केळ्यांचा उपाय कसा करतात याची माहिती जाणून घेणार आहोत.

केळी हे बिनबियांचे फळ आहे. निसर्गतःच जंतुनाशक वेष्टनामध्ये असल्याने केळ्यातून जंतूंची बाधा होत नाही, त्यामुळे आपोआपच सर्वांचे आरोग्य उत्तम राहते. वर्षभर उपलब्ध असणारे, सर्वांच्या खिशाला परवडणारे हे फळ आबालवृद्धांना आवडते. केळ्याला शास्त्रीय भाषेमध्ये 'मुसा पॅराडिसिअॅका' म्हटले जाते. केळ्यापासून तयार केलेला हेअर पॅक तुम्हाला घनदाट आणि निरोगी केस तसेच केसांची गळती, कोंडा थांबवतो. जाणून घेऊयात केळ्यांपासून हेअर पॅक कसा तयार करतात.

**सामग्री**

- केळी
- एक चमचा मध
- एक चमचा केसाला लावायचे तेल
- एक चमचा दही.

**असा तयार करा हेअर पॅक**

- केळ्यांची मिक्सरमध्ये पेस्ट तयार करून घ्या.
- या पेस्टमध्ये मध, तेल आणि दही टाकून पुन्हा मिक्सरमध्ये एकत्र करा.
- त्यानंतर या पेस्टला केसांवर लावा अन् चांगली मालीश करा.
- एक ते दोन तास ही पेस्ट केसावरच राहू द्या.
- तुमच्या नियमित शाम्पूने केसांना चांगले धुऊन घ्या आणि कंडीशनर लावा.

कंडीशनर लावल्यानंतर कंगव्याने केसांना हळूहळू विंचरा; जेणेकरून केसांमधील केळ्याचा तुकडा किंवा हेअर पॅक राहणार नाही. त्यानंतर थोडा वेळ थांबा आणि पुन्हा कंगव्याने केस विंचरा.


# मासिक पाळी अनियमित होण्यामागील कारणे, दुर्लक्ष करू नका

स्त्रियांमध्ये मासिक पाळीचा कालावधी नियमित असणे चांगलेच असते. हे चांगल्या आरोग्याचे सूचक असते. जर ती उशिरा किंवा अनियमित येत असेल तर यामागची अनेक कारणे असू शकतात. जास्त वजन वाढणेदेखील पाळी उशिरा येण्याचे कारण असू शकते. याव्यतिरिक्त इतर कारणं कोणती असू शकतात, जाणून घेऊया...

- जास्त वजन किंवा लठ्ठपणादेखील मासिक पाळीच्या अनियमिततेचे प्रमुख कारण असू शकते. कधी कधी ही समस्या थायरॉईडच्या आजारामुळेसुद्धा उद्भवते. त्यासाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असते.
- कमी किंवा जास्त वयामध्ये मासिक पाळी सुरू होणेदेखील अनियमितता असू शकते. ही एक सामान्य गोष्ट असू शकते. कालांतराने हे नियमित होऊ शकते, काळजी करायचे काहीच कारण नाही.
- पॉलिसिस्टिक अंडाशय सिंड्रोम मासिक पाळी उशिरा येण्याचे एक गंभीर कारण असू शकतं, म्हणून जर का वरील दिलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य काही घडत असल्यास त्याची चौकशी केली पाहिजे.
- जास्त ताण आणि जास्त व्यायाम करणेसुद्धा मासिक पाळीच्या अनियमिततेचे कारण असू शकतं. अंडाशयावर आवरण (सिस्ट) बनल्यामुळेसुद्धा मासिक पाळीची अनियमितता असू शकते.

# पारिजातकाच्या फुलांचे आश्चर्यकारक फायदे

- **ताण कमी करते :** पारिजातकाच्या फुलांमध्ये ताण दूर करण्याची शक्ती असते. जीवनात हे फूल आनंद पसरवते. त्याच्या सुगंधामुळे मेंदूला शांतता मिळते.
- **थकवा निवळतो :** पारिजातकाची फुले रात्रीच्या वेळी उमलतात आणि सकाळी कोमेजतात. अशी आख्यायिका आहे की पारिजातकाला स्पर्श मात्र केल्यानेच अंगातला सर्व थकवा दूर होतो.
- **चिरतारुण्य :** पौराणिक कथेनुसार पारिजातकाच्या झाडाला स्वर्गातून पृथ्वीवर आणल्याचे मानले जाते. नरकासुराच्या वध केल्यावर श्रीकृष्ण स्वर्गात गेले असताना इंद्राने त्यांना पारिजातकाचे फूल दिले. कृष्णाने ते फूल देवी रुक्मिणीला दिले. देवी सत्यभामेला देवलोकाची देवमाता आदितीने नेहमी चिरतारुण्य राहण्याचा वर दिला. तेवढ्यात नारद तिथे आले आणि त्यांनीही सत्यभामेला पारिजातकाची महती सांगितली. त्या प्रभावामुळे देवी रुक्मिणी पण चिरतारुण्यवती झाली. सत्यभामेला हे कळल्यावर ती क्रोधीत झाली. तीने श्रीकृष्णाकडून पारिजातक वृक्ष घेण्याचा आग्रह धरला. अशी आख्यायिका आहे की, पारिजातकाच्या वृक्षाचा उगम समुद्रमंथनाच्या वेळेस झाला होता; ज्याला इंद्राने आपल्या बागेत लावला होता.



- **हृदयविकारावर फायदेशीर :** पारिजातक हृदयविकारामध्ये फायदेशीर असते. १५ ते २० फुलांचा रस घेणे हृदयासाठी फायदेशीर असते. हृदयरोग रोखण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग आहे. हा उपाय डॉक्टरांच्या सल्ल्याने करायला हवा.

# अनुलोम, विलोम म्हणजे काय? हे घरी कसे करावे?



**प्राणायामाची सुरुवातीची क्रिया आहे अनुलोम आणि विलोम. यामुळे मेंदूमध्ये ऑक्सिजनची पातळी वाढते. यामुळे फुफ्फुसं बळकट होतात. कोरोनाच्या संसर्गाच्या काळात आपले फुफ्फुस बळकट असणे गरजेचे आहे. जाणून घेऊ या अनुलोम, विलोम प्राणायाम कसा करावा...**

प्राणायामात ३ क्रिया करतात

**१. पूरक, २. कुंभक, ३. रेचक**

यालाच हठयोगी अभ्यानंतर वृत्ती, स्तंभ वृत्ती आणि बाह्य वृत्ती असेही म्हणतात. हेच अनुलोम आणि विलोम आहे. नाडीशोधन प्राणायामाची ही सुरुवातीची क्रिया असते.

**१. पूरक :** नियंत्रित वेगाने श्वासाला आत घेण्याची क्रिया पूरक असते. श्वास आत घेताना किंवा बाहेर सोडताना दोन्ही वेळेस त्यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे असते.

**२. कुंभक :** आत घेतलेल्या श्वासाला क्षमतेनुसार रोखून धरण्याच्या प्रक्रियेला कुंभक म्हणतात. श्वास आत रोखण्याची क्रिया आंतरिक कुंभक आणि श्वासाला बाहेर सोडून काही वेळ थांबण्याच्या क्रियेला बाह्य कुंभक म्हणतात. यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे आहे.

**३. रेचक :** आत घेतलेला श्वास हळुवारपणे सोडण्याच्या क्रियेला रेचक म्हणतात. यामध्ये श्वास घेताना आणि सोडताना दोन्ही वेळेस लय आणि अनुपात असायला हवा.

**फायदे :** सर्व प्रकारचे ताणतणाव कमी करून शांती देणाऱ्या या प्राणायामामुळे शरीराच्या सर्व नाड्यांना लाभ मिळतो. डोळे सतेज होतात, रक्तपुरवठा सुरळीत होतो. निद्रानाशाचा त्रास असल्यास त्यासाठी पण हे फायदेशीर आहे. त्याचबरोबर मेंदूचे सर्व विकार दूर करण्यासाठी सक्षम आहे. या प्राणायामामुळे फुफ्फुसात साचलेली घाण बाहेर निघते आणि फुफ्फुसं बळकट बनतात. किमान १० मिनिटे अनुलोम, विलोम प्राणायाम केल्याने डोकेदुखीच्या आजारापासून मुक्ती मिळते. नकारात्मक विचारांपासून मन दूर होऊन आनंद आणि उत्साहात वाढ होते.



# आता मुंबईतील या भागात दर शुक्रवारी सार्वजनिक वाहनांचाच वापर : एमएमआरडीए

**काय झाली चर्चा?**

या गोलमेज परिषदेत सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये फीडर बस सेवा अधिक मजबूत करणे, पादचारी सुविधा सुधारणे, मुंबई वन प्लॅटफॉर्मशी अधिक चांगले एकत्रीकरण करणे, ट्रान्झिट हबजवळ समर्पित ऑटो-रिक्षा सुविधा उपलब्ध करणे आणि शाश्वत वाहतूक पर्याय निवडणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारे कॉर्पोरेट प्रोत्साहन कार्यक्रम राबविणे यांचा समावेश आहे. बेंगळुरूमध्ये राबविण्यात आलेल्या यशस्वी वर्तनबदल उपक्रमांपासूनही या चर्चेला प्रेरणा मिळाली. अशा कॉर्पोरेट मोबिलिटी कार्यक्रमांमुळे एका महिन्यात 36000 हून अधिक मेट्रो प्रवास नोंदवले गेले होते. एमएमआरसी, एमएमएमओसीएल, बेस्ट उपक्रम, मुंबई वाहतूक पोलीस, बीकेसी स्थित आघाडीच्या कंपन्या, बीकेसी मूव्हस कलेक्टिव्हचे सदस्य आणि गतिशीलता तज्ज्ञ या गोलमेज परिषदेत सहभागी झाले. सर्वांनी संयुक्त प्रयत्नांद्वारे शाश्वत गतिशीलता पुढे नेण्याची बांधिलकी व्यक्त केली. ह्यबीकेसी साप्ताहिक सार्वजनिक वाहतूक दिनह्ण हा उपक्रम राष्ट्रीय पातळीवरील आदर्श ठरण्याची अपेक्षा आहे. शासन संस्था, वाहतूक सेवा पुरवठादार, उद्योगक्षेत्र आणि नागरिक एकत्रितपणे काम केल्यास अधिक स्वच्छ, कमी गर्दीची आणि अधिक शाश्वत शहरी केंद्रे निर्माण करता येऊ शकतात, हे या उपक्रमातून स्पष्ट होणार आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

बीकेसी परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. 12 जूनपासून प्रत्येक शुक्रवार ह्यापब्लिक ट्रान्सपोर्ट डेह्ल म्हणून पाळला जाणार असून जवळपास दोन लाख कर्मचाऱ्यांना ट्रेन, मेट्रो आणि बसचा वापर करण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे. बीकेसीसारख्या मोठ्या व्यावसायिक केंद्रामधील असा उपक्रम हा देशातील पहिलाच असा उपक्रम ठरला आहे.

**शुक्रवारच का निवडला?**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बीकेसीमधील सुमारे 90 कंपन्या आणि संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेत बेस्ट, मुंबई मेट्रो, वाहतूक पोलीस, रिक्षा संघटना आणि डब्ल्यूआरआय इंडिया यांचाही सहभाग असेल. आठवड्याच्या शेवटी कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण तुलनेने कमी असतो, त्यामुळे ते




**दोन लाख लोकांना आवाहन**

भारताचे आघाडीचे व्यावसायिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीकेसीमध्ये जवळपास 2 लाख औपचारिक रोजगार आहेत, तर अनौपचारिक रोजगारांची संख्याही तितकीच किंवा त्याहून अधिक आहे. बीएसई सेन्सेक्समधील 75 टक्के कंपन्या आणि निफ्टी 50 मधील 50 टक्के कंपन्या बीकेसीमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे बीकेसी हे देशातील अत्यंत महत्त्वाच्या आर्थिक केंद्रांपैकी एक मानले जाते. सार्वजनिक वाहतुकीची सुविधा वाढत असतानाही, गोलमेज परिषदेत सादर करण्यात आलेल्या गतिशीलता अभ्यासातून असे दिसून आले की, 52 टक्के प्रवासी अद्यापही वैयक्तिक वाहने, टॅक्सी आणि ऑटो-रिक्षांवर अवलंबून आहेत, तर केवळ 25 टक्के प्रवासी दैनंदिन प्रवासासाठी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करतात. 54 टक्क्यांहून अधिक प्रवाशांना दररोज प्रवासासाठी दोन तासांपेक्षा जास्त वेळ लागतो, तर प्रत्येक पाच प्रवाशांपैकी एका प्रवाशाचा प्रवास तीन तासांपेक्षा अधिक असतो.

पर्यायी वाहतूक साधनांचा वापर करण्यास अधिक तयार असतात. याच कारणामुळे शुक्रवारची निवड करण्यात आली आहे.

**तीन ते चार महिने होणार चाचणी**

या उपक्रमावर किमान तीन ते चार महिने बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. दर आठवड्याला येणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. अलीकडेच करण्यात आलेल्या सर्वेक्षणात 82 टक्के प्रवाशांनी सार्वजनिक वाहतूक अधिक विश्वासार्ह आणि सोयीस्कर झाल्यास ती वापरण्याची तयारी दर्शवली आहे.

**प्रवाशांच्या मुख्य तक्रारी काय?**

बीकेसीमध्ये येणाऱ्या प्रवाशांची सर्वात मोठी अडचण म्हणजे ह्यलास्ट माईल कनेक्टिव्हिटीह्ल. मेट्रो स्थानकातून बाहेर पडल्यावर कार्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी शेअर रिक्षा किंवा बस सहज उपलब्ध नसल्याची तक्रार अनेकांनी केली आहे. याशिवाय पादचारी सुविधांचा अभाव, चालण्यासाठी सावली नसणे आणि बेस्ट बसच्या फेऱ्यांची कमतरता हीही प्रमुख समस्या असल्याचे समोर आले आहे.

**52 टक्के प्रवासी अजूनही खासगी वाहनांवर अवलंबून**

एमएमआरडीएच्या माहितीनुसार, बीकेसीमध्ये येणाऱ्या 52 टक्के लोकांचा प्रवास अजूनही खासगी कार, टॅक्सी किंवा रिक्षांवर अवलंबून आहे. तर केवळ 25 टक्के लोक सार्वजनिक वाहतुकीचा वापर करतात. याशिवाय बीकेसीतील निम्म्याहून अधिक कर्मचाऱ्यांचा रोजचा प्रवास करताना दोन तासांपेक्षा जास्त वेळ जातो.

**काय सुधारणा होणार?**

बीकेसीमधील प्रवास अधिक सोयीस्कर करण्यासाठी अनेक उपाययोजनांचा विचार सुरू आहे. प्रमुख कनेक्टर्सवर बेस्ट बसेससाठी स्वतंत्र व्यवस्था, कार्यालयीन संकुलांमधील अंतर्गत रस्ते पादचाऱ्यांसाठी खुले करणे, सावलीयुक्त पादचारी मार्ग तयार करणे आणि मेट्रो अधिक चांगल्या प्रकारे जोडणे यांचा समावेश आहे. तसेच झाडांची संख्या वाढवणे, कोणत्याही हवामानात वापरता येतील असे पदपथ तयार करणे आणि प्रवाशांसाठी अधिक सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे.

**कर्मचाऱ्यांना कसं प्रोत्साहन मिळणार?**

सार्वजनिक वाहतूक वापरणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष बक्षीस योजना, त्यांच्या प्रवास खर्चाची परतावा अशा प्रोत्साहनपर उपायांवरही चर्चा सुरू आहे. एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांनी स्वतः आणि त्यांच्या टीमनेही प्रत्येक शुक्रवारी सार्वजनिक वाहतुकीचा वापर करण्याची शपथ घेतल्याचेही सांगितले आहे.

## पुण्यात 25 वर्षीय तरुणीचा प्रताप

### पोलीस उपनिरीक्षक होऊन फिरत होती तोतया 'लेडी सिंघम'

■पुणे। प्रतिनिधी,

अंगावर खाकी आणि खांद्यावर स्टार लावून फिरणाऱ्या तोत्या "लेडी सिंघम"ला अटक करण्यात आली आहे. 25 वर्षीय तरुणीला पुण्यातील लष्कर पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी ताब्यात घेऊन अटक केली. संबंधित तरुणी पोलीस उपनिरीक्षकांचा गणवेश परिधान करून नागरिकांवर रुबाब दाखवत होती असं सांगण्यात आलं.

प्राथमिक माहितीनुसार एका नामांकित क्लिनिकमध्ये अपॉइंटमेंट मिळावी म्हणून या तरुणीनं पोलिसांचा गणवेश करत बनाव रचला. समिना आसिफ इनामदार उर्फ समिना अयुब पठाण (वय 25) असं अटक केलेल्या महिला आरोपीचं नाव आहे. ही कारवाई शनिवार, 6 जून 2026 रोजी पुण्यातील कॅम्प परिसरात करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेचं पोलीस बनण्याचं स्वप्न भंगलं होतं. काही दिवसांपासून ती एक खासगी कंपनीत काम करत होती.




**पोलिसांच्या वर्दीत एका खाजगी क्लिनिक बाहेर...**

6 जून रोजी पुण्यातील लष्कर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक महेश शिंदे कॅम्प परिसरात गस्तीवर असताना त्यांना आरोपी पोलिसांच्या वर्दीत एका खाजगी क्लिनिक बाहेर उभी असल्याचं दिसलं. शिंदे यांना संबंधित महिला पोलीस नसल्याचा संशय आला. त्यांनी त्यांच्या महिला कर्मचाऱ्याच्या मदतीने संबंधित महिलेकडे जाऊन कुठल्या पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत, आय डी आहे का? यासारखे पोलिसी भाषांतील प्रश्न विचारले असता महिलेची बोलती बंद झाली. अधिक चौकशी करता तोतया असल्याचं निष्पन्न झालं.

समिनाला एका खाजगी क्लिनिकमध्ये उपचारांसाठी डॉक्टरांची वेळ हवी होती. मात्र, तिला डॉक्टरांची वेळ मिळत नव्हती. त्यामुळे तिने पोलिसांचा गणवेश परिधान करून रिसेप्शन आणि अन्य लोकांवर आपण पोलीस असल्याचा दबाव टाकून अपॉईंटमेंट मिळवण्याचा प्रयत्न केल्याचं प्राथमिक तपासातून समोर आलं आहे. याप्रकरणी पोलीस पुढील तपास करत आणखी माहिती मिळवण्याचा प्रयत्न करून आरोपीच्या बनावामागं आणखी कोणतं कारण होतं का, याचा उलगडा करू पाहत आहेत.

पुण्यात गेल्या काही दिवसांपासून सातत्यानं गुन्हेगारीत वाढ होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत ज्या पोलिसांकडे नागरिक तक्रार निवारणासाठी येतात, त्याच पोलिसांचा वेश धारण करून ही महिला बनाव रचत होती, आपले मनसुबे साध्य करू पाहत होती, याबाबतचा उलगडा होताच पोलिसांनाही धक्का बसला.

## मोबाईल कॅमेऱ्याच्या झूममुळे उलगडलं रहस्य

### विरारच्या डोंगरात झाडाला लटकलेला तरुणाचा मृतदेह आढळला

■विरार। प्रतिनिधी,

विरार तालुक्यातील मांडवी परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. काशीद कोपर येथील कुलस्वाई माता मंदिराजवळील डोंगराळ भागात एका ३४ वर्षीय तरुणाचा झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. विशेष म्हणजे, मंदिर परिसरात फोटोशूट करत असलेल्या एका तरुणाने फोटोला झूम केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आणला.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास दक्ष पाटील हा तरुण कुलस्वाई माता मंदिर परिसरात छायाचित्रण करत होता. यावेळी त्याने डोंगराळ भागाकडे मोबाईलचा कॅमेरा झूम करून पाहिले असता एका झाडाला व्यक्ती लटकलेल्या



अवस्थेत दिसून आली. हा प्रकार लक्षात येताच त्याने तात्काळ मांडवी पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांचे पथक आणि स्थानिक ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पाहणी केली असता संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी तपास करण्यात आला असता त्याच्याकडील आधार कार्डावरून त्याचे नाव लालमोहन पारस चौहान (वय 34) असे असल्याचे समोर आले. तो मूळचा उत्तर प्रदेशचा रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. प्राथमिक तपासात हा प्रकार आत्महत्येचा असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असला तरी मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी मांडवी पोलीस अधिक तपास करत आहेत.

दरम्यान, दुर्गम डोंगराळ भागात हा मृतदेह होता. त्यामुळे मोबाईल कॅमेऱ्याचा झूम वापरून हा प्रकार निदर्शनास आला नसता, तर मृतदेह अनेक दिवस तिथेच राहिला असता, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

## ठाण्यात निकाल घेऊन घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यावर हल्ला

■ठाणे। प्रतिनिधी,

दहावीचा निकाल घेऊन घरी परतणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्यावर जुन्या वादातून चाकूने हल्ला झाल्याची धक्कादायक घटना ठाण्यातील दहीसर परिसरात घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी बापलेकाविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हनीफ साबीर शेख (१७) हा २ जून रोजी दहावीचा निकाल घेऊन घरी परतत असताना त्याला मेहफुस शेख याचा फोन आला. मेहफुसने हनीफला दहीसर येथे भेटण्यासाठी बोलावले. त्यानुसार हनीफ हा त्याचा मित्र शेहबाज इमरान खान याच्यासह ठरलेल्या ठिकाणी गेला. तेथे मेहफुस शेख आणि त्याचे दोन मित्र उपस्थित होते. तक्रारीनुसार, भेट होताच मेहफुस आणि त्याच्या साथीदारांनी हनीफला धक्काबुक्की करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी मेहफुसचे वडील मेहबुब शेख घटनास्थळी आले आणि त्यांनी हनीफचे दोन्ही हात पकडून धरल्याचा आरोप आहे. त्यानंतर मेहफुसने धारदार हत्याराने हनीफच्या छातीवर आणि पोटावर वार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## घरासमोर लघुशंकेला विरोध, महिलेला गुप्तांगावर मारहाण

■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील पिंपळनेर पोलीस ठाणे परिसरातील रंजेगाव येथे एक धक्कादायक आणि माणुसकीला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. गावातील जुगाराच्या अड्ड्याला विरोध केल्याने एका महिलेला बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणातील आरोपी निखिल आबूज आणि त्याच्या इतर चार ते पाच साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. संबंधित आरोपी हे वाल्मिक कराडचे समर्थक असल्याची माहिती समोर आली. वाल्मिक कराडसोबत त्याचे काही फोटो आहेत.

**घरासमोर लघुशंका करण्यास विरोध केल्यानं महिलेला**



**मारहाण**

गावात सुरू असलेल्या जुगार या खेळामुळे लहान मुलांवर वाईट परिणाम होतो, असे महिलेचे म्हणणे आहे. एवढंच नाही,तर महिलेच्या घरासमोर लघुशंका करण्यात आली होती, असे संबंधित महिलेचं म्हणणे आहे. याच संतापातून आरोपींनी महिलेला बेदम मारहाण केली. या मारहाणीमुळे महिलेच्या अंगावर मारहाणीच्या खुना आढळून आल्या होत्या.

**गुप्तांगावर बेल्टने मारहाण**

एवढंच नाही,तर शरीरावर मारहाणीच्या खुणा दिसू नयेत म्हणून तिच्या गुप्तांगावर बेल्टने मारहाण करण्यात आल्याचा क्रूर आणि भयंकर प्रकार उघडकीस आला. या हल्ल्यादरम्यान महिलेच्या दोन लहान मुलांना आरोपींनी उचलून फेकलं. अशातच त्या लहान मुलांना किरकोळ जखम झाली. अशातच जखमी झालेल्या शासकीय बीड रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, गुन्हा दाखल करण्यात आला असला तरीही आरोपींना अद्याप अटक करण्यात आली नाही. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. वाढत्या गुन्हेगारीनं बीड हे गुन्हेगारीचं हॉट्स्पॉट ठरलं असं म्हटलं तरीही वावगं ठरणार नाही.

## बीडमध्ये सासरच्या छळाला वैतागून 20 वर्षीय पूजाने आयुष्याचा दोर कापला

■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील गेवराई शहरातून एक अत्यंत दुदैवी आणि संतापजनक घटना समोर आली आहे. अवघ्या 20 वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन स्वतःचे जीवन संपवले आहे. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पूजा प्रमोद सुरवसे असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे.

या प्रकरणाने सासरच्या मंडळींच्या क्रूरतेची सर्वांसमोर उघड झालीये. मृत विवाहितेच्या माहेरच्यांनी दिलेल्या तक्रारीनंतर पतीसह सासरच्या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सासरच्या छळाला वैतागून**



**पूजाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला**

मिळालेल्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी पूजाचे तिच्या माहेरच्यांशी बोलणे झाले होते, मात्र त्यानंतर काही तासांतच तिला मृत अवस्थेत पाहण्याचे दुर्दैव तिच्या कुटुंबीयांवर ओढवले. वडिलांना फोनवरून मुलीने आत्महत्या केल्याची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ रुग्णालयात धाव घेतली, जिथे त्यांना मुलीचा मृतदेह पाहून धक्का बसला. पूजाचा मृतदेह गेवराई येथील शासकीय रुग्णालयात आढळून आला. या घटनेने पूजाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्यांनी सासरच्या मंडळींवर गंभीर आरोप केले आहेत.

**पूजाने उचलले टोकाचे पाऊल**

मृत विवाहितेच्या भावाने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, लग्नानंतर पूजाचा पती प्रमोद साईनाथ सुरवसे, सासरे साईनाथ बापुराव सुरवसे, सासू उषाबाई उर्फ जिजी साईनाथ सुरवसे, दीर गणेश साईनाथ सुरवसे, जाऊ आरती गणेश सुरवसे आणि नणंद अर्चना तुळसे यांनी तिला सतत त्रास दिला. लग्नानंतर हे सर्वजण पूजाकडे व्यवसायासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी करत होते. या मागणीसाठी तिला शारीरिक आणि मानसिक छळाला सामोरे जावे लागत होते. या जाचाला कंटाळून आणि सासरच्या छळाला वैतागून पूजाने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सध्या पोलीस यंत्रणेकडून या घटनेचा सखोल तपास सुरू आहे. तक्रारीतील सर्व मुद्द्यांची पडताळणी केली जात असून, पोलिसांकडून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. विवाहितेच्या आत्महत्येमुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून, हुंडाबळीच्या या प्रकारामुळे पुन्हा एकदा विवाहित महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## लिव्ह-इन पार्टनरसोबत मिळून आईने 5 वर्षाच्या मुलीसोबत नको तेच...

**आई आणि लिव्ह पार्टनरविरूद्ध गुन्हा दाखल**

पोलीस अधिकाऱ्याच्या माहितीनुसार, आईची ओळख वेन्नेला अशी पटली आहे. दरम्यान 25 मार्च रोजी मुलीचा मृतदेह आढळून आला होता. या घटनेनंतर मुलीच्या वडिलांनी 4 जून रोजी कडुगाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी पतीपासून विभक्त झालेल्या प्रियांका आणि लिव्ह इन पार्टनर मोहनविरूद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला. या तक्रारीच्या आधारे मोहनला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी केली जाते, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने माहिती दिली.

■मुंबई। प्रतिनिधी,

कर्नाटकच्या बंगळुरूतून आई आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. जिथे आईनेच आपल्या 5 वर्षीय मुलीची हत्या केली. आई आपल्या लिव्हइन पार्टनरसोबत राहत होती. मिळालेल्या माहितीनुसार, महिला पाच वर्षाच्या मुलीला नात्यातील अडथळा मानत होती, त्यामुळेच तिने मुलीची हत्या केली. सध्या, पोलिसांनी मुलीच्या हत्येप्रकरणी 39 वर्षीय महिला आणि लिव्हइन पार्टनरविरूद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस पथकाने दोघांचही चौकशी करत प्रकरणाचा तपास सुरू केला.

**मुलीने बिर्याणी खाल्ल्याचा आईचा दावा**

एफआयआयनुसार, प्रियांकाने सुरूवातीला सांगितलं की, 24 मार्च रोजी मुलीने रात्री बियार्णी खाल्ल्याचा तिच्या आईने दावा केला होता. मात्र, नंतर दावा केला की, कोलारमधील एका कॅफेत मुलीचा वाढदिवस साजरा करताना तिला वातानुकूलित गाडीत झोपवून ठेवण्यात आले, नंतर ते घरी परतले आणि दुसऱ्याच दिवशी मृतावस्थेत आढळून आली.

**आईच मुलीला प्रेमसंबंधाच्या नात्यातील अडथळा मानत असल्याचा संशय**

दरम्यान, पोलिसांच्या पथकने या प्रकरणाचा तपास केला. पोलिसांनी सांगितलं की, शवविच्छेदन अहवालानंतर मुलीच्या वडिलांना भलताच संशय बळावला गेला. नंतर त्यांनी शवविच्छेदन अहवाल त्यांच्या बहिणीला आणि इंग्लंडमधील एका बालरोगतज्ञाला दाखवला होता. ज्यामुळे मुलीच्या मृत्यूचं कारण त्या अहवालामुळे समोर आले. आईच मुलीला आपल्या प्रेमसंबंधाच्या नात्यातील अडथळा मानत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलीस वडिलांच्या आरोपांची कसून चौकशी करत आहेत.




## आई प्रियकरासोबत राहायची, 4 वर्षाच्या निष्पाप मुलासोबत भयंकर घडलं

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे जिल्ह्यातील काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अतिशय संतापजनक घटना समोर आलीये. एका चार वर्षांच्या निष्पाप मुलाचा त्याच्या आईच्या प्रियकराने अमानुष मारहाण करून जीव घेतलाय. शंभू शर्मा असे आरोपीचे नाव असून, तो मृत मुलाच्या आईसोबत राहत होता. आरोपीने मुलाला इतक्या क्रूरतेने मारहाण केली की त्यातच त्याचा दुदैवी मृत्यू झाला. सुरुवातीला या घटनेला नैसर्गिक मृत्यूचा मुलामा देण्याचा प्रयत्न आरोपीकडून करण्यात आला होता, मात्र पोलिसांनी सतर्कता दाखवत प्रकरणाचा छडा लावला.

**आईचा प्रियकर शंभू शर्माला अटक**

शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त होताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि संशयित शंभू शर्मा याला ताब्यात घेतले. कठोर चौकशी केल्यानंतर शंभू शर्माने आपणच या चार वर्षांच्या चिमुरड्याला मारहाण केल्याची कबुली दिली. त्यानंतर मंगळवारी काशिमीरा पोलिसांनी आरोपी शंभू शर्माविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. या घटनेने काशिमीरा आणि



**मुलाच्या शरीरावर मारहाणीच्या खुणा आढळल्या**

घटनेच्या दिवशी मुलाचा मृत्यू झाल्यानंतर, हा मृत्यू नैसर्गिक असल्याचे भासवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, काशिमीरा पोलिसांना या प्रकरणाबाबत संशय आल्याने त्यांनी मृतदेहाचा पंचनामा केला. यावेळी पोलिसांना मुलाच्या शरीरावर मारहाणीच्या स्पष्ट खुणा आढळून आल्या. त्यानंतर पोलिसांनी तातडीने मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. शवविच्छेदनाच्या अहवालातून या मुलाचा मृत्यू नैसर्गिक नसून त्याला झालेल्या अमानुष मारहाणीमुळे शरीराच्या आतील भागांना गंभीर दुखापत झाल्याने झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

संपूर्ण ठाणे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करत आहेत. आरोपीने चिमुकल्या मुलाला नेमक्या कोणत्या कारणावरून इतक्या भीषण पद्धतीने मारहाण केली, याचा शोध पोलीस घेत आहेत. तसेच, या घटनेच्या वेळी मुलाची आई कुठे होती आणि तिला या कथित गुन्ह्याबद्दल किंवा मारहाणीबद्दल काही कल्पना होती का? या दिशेनेही पोलीस तपास करत आहेत. या अमानुष कृत्यामुळे एका निष्पाप मुलाचा जीव गेला असून, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी परिसरातून होत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com